**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २९२ वा | शुक्रवार, दि. ०४ जुलै २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# मराठी-हिंदीच्या वादात भाजप, ठाकरे बंधूचं गणित साधलं; तरंगत्या भुमिकेने शिंदेंची मात्र कोंडी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** हिंदी भाषा सक्तीच्या मुद्दयावरून गेले काही दिवस रान पेटले होते. ठाकरे बंधू एकवटल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून काढलेले दोन्ही जीआर रद्द करण्यात अचानक 360 अंशात माघार घेतली. या सर्व राजकीय वादाचे परिणाम आगामी काळात होत असलेल्या मुंबई महापालिका निवडणुकावर होणार आहेत.

गेल्या काही दिवसापासून मराठीच्या मुद्दयामुळे विखुरलेला मराठी माणूस राज व उद्धव ठाकरे बंधूंच्या बाजूने उभा राहणार आहे. तर दुसरीकडे भाजपने हिंदी भाषिकाची बाजू लावून धरत त्यांच्या मतांची बेगमी केली आहे. दुसरीकडे या राजकीय वादात धरसोड वृत्तीमुळे शिंदेंच्या शिवसेना बॅकफूटला दिसत आहे.



राज्य सरकारने राज्यात पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याबाबतचा निर्णय घेतला होता. हा निर्णय राज्य सरकारचा असला तरी शिवसेना शिंदे गटाचे मंत्री असलेल्या दादा भुसे यांच्या शालेय शिक्षण विभागाने त्याबाबतचा अध्यादेश काढला होता. त्यावरून वाद सुरू होताच भाजपने हिंदी शिकवणे कसे योग्य आहे, याबाबत जोरकसपणे बाजू मांडली. त्याच ताकदीने त्याला शिवसेना ठाकरे गट आणि मनसेने विरोध करीत राजकीय मतभेद विसरून संयुक्त मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता.

शिवसेना आणि मराठी हे अतूट नाते असतानाही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सुरुवातीला कोणतीच भूमिका घेतली नाही. त्यानंतर मंत्रिमंडळ बैठकीत त्यांनी हिंदीबाबतच्या निर्णयाला विरोध करीत हा निर्णय मागे घेण्यास भाग पाडले खरे, पण त्या सर्व बाबी सामान्यांपर्यंत पोहोचली नाही. या निर्णयाबद्दल शिवसेनेतील अनेक नेते नाराज होते, मात्र कुणीही जाहीरपणे नाराजी बोलून दाखवली नाही. भरीस भर म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील शेवटच्या टप्प्यात या निर्णयाला विरोध केला. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची खूप अडचण झाली.

येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्याची तयारी सर्वच पक्षाने सुरु केली आहे. हिंदी सक्तीच्या मुद्दयावरून भाजपने हिंदीची बाजू लावून धरीत हिंदी भाषिक मतांची बेगमी साधली आहे. तर मनसे आणि शिवसेना ठाकरे गटानेही हिंदीसक्तीला टोकाचा विरोध करीत काहीसा विखुरलेला मराठी माणूस जवळ करण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाने सुरुवातीला ठोस भूमिकाच घेतली नाही. त्याचा त्यांना राजकीय आखाड्यात फटका बसेल, असा अंदाज लावला जात आहे.

## 'राम कृष्ण हरी आपली तुतारीच बरी'

## बळीराम साठे यांनी फुंकली पुन्हा तुतारी, शरद पवार यांनी केली नाराजी दूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील शरद पवार यांचे खंदे समर्थक बळीराम साठे यांनी खासदार धैर्यशील मोहीते पाटील यांच्यावर शरसंधान करत राष्ट्रवादी पक्षाला 'राम राम' केल्याने राजकीय वतुर्ळात मोठ्या उलथापालथीचे संकेत मीळत होते यामुळे आगामी जिल्हा परिषद निवडणूकांची राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त होत होती.बळीराम साठे यांच्या भूमीकेकडे राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले होते. 'राम कृष्ण हरी आता पुन्हा नको तुतारी' अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते बळिराम साठे यांनी जाहीर केली होती. पुढील राजकीय वाटचाल शिंदे सेनेसोबत करण्याच्या त्यांच्या हालचाली सुरू होत्या.आमदार राजू खरे, शींदे सेना पक्षाचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे व माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी त्यांची वडाळा येथे जाऊन भेट घेतली होती. मात्र बळिराम साठे यांच्या या निर्णयाबाबत कार्यकत्यांमध्ये मतमतांतरे होती, शिंदे सेनेऐवजी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटच बरा, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये होती.

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे घनिष्ठ सहकारी व राष्ट्रवादी काँग्रेस स्थापन झाल्यापासून त्यांच्या सोबत असलेले माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बळीराम साठे यांनी शरद पवार गट सोडण्याचा निर्णय जाहीर केला . बळीराम साठे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदावरून हटवून त्यांच्या जागी मोहिते पाटील समर्थक जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव देशमुख यांची वर्णी लावण्यात आली त्यामुळे. बळीराम



साठे यांना विचारात न घेता त्यांना पदावरून हटविण्यात आले, त्यामुळे साठे यांच्यासह समर्थकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत होती.

लोकसभेच्या निवडणुकीपासूनच आपल्याला त्रास दिला जात असल्याचा दावा त्यांनी केला होता. धैर्यशील मोहिते- पाटील यांचा संघटनेत वारंवार हस्तक्षेप सुरूच राहिला. जिल्हाध्यक्ष असणाऱ्या साठे यांना वगळून परस्पर निवडी केल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्याचबरोबर विधानसभा निवडणुकीच्या वेळी मोहोळ उत्तर सोलापूर विधानसभा मतदारसंघात कमकुवत उमेदवार देण्याचे षड्यंत्र रचले. ते हाणून पाडून सक्षम उमेदवार निवडून आणला तेव्हापासून वरिष्ठ पातळीवरून हालचाली सुरू होत्या. यामुळेच जिल्हाध्यक्ष पदावरून दूर केले, असा दावाही यावेळी त्यांनी केला होता. ज्या मोहिते-पाटलांना अडचणीच्या काळात त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी पुढाकार घेतला, त्यांनीच त्रास देण्यास सुरवात केली

जिल्हाध्यक्ष असूनही विधानसभा निवडणुकीत एबी फॉर्म देण्यास वरिष्ठ पातळीवरून टाळाटाळ करण्यात आली.माज्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत शरद पवारांना वारंवार सांगितले, मात्र त्यांनी दखल घेतलीच नाही. विधानसभा निवडणुकीत मोहोळ मतदारसंघातून सिद्धी कदम हिची उमेदवारी रद्द करून राजू खरे यांना एबी फार्म दिल्याचा मोहिते पाटलांना राग होता, असेही साठे यांनी सांगितले. त्या वेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, धैर्यशील मोहिते पाटील यांच्यात बेबनाव झाला होता. तेव्हापासून साठे यांना पदावरून हटविण्याबाबत प्रयत्न सुरू होते. वडाळा येथे साठे समर्थक कार्यकर्त्यांच्या बैठकीत काही कार्यकत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट सोडून देण्याची मागणी केली तर काहींनी झालेला अन्याय पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासमोर मांडावा अशी मागणी केली. मात्र या बैठकीनंतर झालेल्या घडामोडींमुळे साठे हे शिंदे सेनेत जाणार, अशी चिन्हे दिसू लागली होती. मात्र गेल्या पन्नास वर्षातील साठे यांचे राजकारण व त्यांच्या कार्यकर्त्यांचा पिंड पाहता, त्यांना हा पक्ष कितपत मानवेल याबाबत कार्यकर्ते शंका उपस्थित करत होते. याचवेळी काही कार्यकर्ते शिंदे सेनेऐवजी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा पर्याय निवडावा, अशीही मागणी करत होते.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदाची धुरा गेली दहा वर्षे बळिराम साठे यांच्याकडे होती. मात्र त्यांना विश्वासात न घेताच नवीन **(पान 2 वर..)**

## माउलीच्या पालखीचे नेत्रदीपक रिंगण आणि बंधुभेट

### संतांच्या पालख्यांचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढ शु. अष्टमीला तोंडले येथून सोहळा निघाल्यावर वाटेत सोपानकाकांच्या पालखीची व माउलींच्या पालखीची बंधु भेट माळशिरस तालुक्याच्या हद्दीत झाली. दुपारच्या भोजनानंतर टप्पा येथे माउलींचा पालखी सोहळा विसावतो. याच वेळेस सोपानकाकांचा पालखी सोहळा शेजारून पुढे जातो. सोपानकाकांचा रथ माउलींच्या रथा शेजारी आल्यावर थोडा वेळ थांबतो यावेळी दोन्ही संस्थानकडून परस्परांना नारळ प्रसाद दिला जातो. तत्पुर्वी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे ठाकूर बुवा समाधी येथे नेत्रदीपक गोल रिंगण संपन्न झाले.




माउलीची पालखी वेळापूर येथून प्रस्थान झाल्यानंतर ठाकूर बुवा समाधी या ठिकाणी पालखी पोहचली. या ठिकाणी संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचा माउली माउली , टाळ मृदुंग च्या जयघोष करीत रिंगण सोहळा पार पडला रिंगण सोहळा पार पडल्यानंतर पालखी पुढे मार्गस्थ झाली. काही वेळातच माळशिरस तालुक्याच्या हद्दीत जेष्ठ बंधू सोपानदेव महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज पालखीची भेट झाली.या दोन पालख्या एकमेकान भेटल्या. या वेळी उपस्थित भाविकांनी विठ्ठल विठ्ठलचा जयघोष केला. माउलीच्या पालखी विश्वस्तांनी सोपानदेव यांच्या मानकरी याना मानाचा नारळ प्रसाद दिला. बंधू भेटीचा भावपूर्ण सोहळा पाहून भाविक सुखावले. पुढे माउलीची पालखी भंडीशेगाव येथे मुक्कमी पोहचली.

जगद्गुरू संत तुकारम महाराज यांच्या पालखीने बोरगाव पालखी मार्गस्थ होत तोंडले बोंडले या ठिकाणी पोहचली. या ठिकाणी पालखीतील सर्व भाविक धावले. तुका म्हणे धावा ... आहे पंढरीस विसावा या अभंगाप्रमाणे भाविकांनी धावा केला. आणि पालखी पिराची कुरोली येथे मुक्कमी पोहोचली.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, पंढपूर तालुक्यात आगमण झाले. या पालख्यांचे पंढरपूर तालुका प्रशासनाच्या वतीने तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे यांनी स्वागत केले.

## मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्रात सात लाख पेक्षा अधिक वारकरी विश्रांतीला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्रात आत्तापर्यंत 55 जर्मन हॅंगर निवारा कक्षात सात लाख पेक्षा अधिक भाविकांनी विश्रांती घेतली आहे. ग्रामविकास व पंचायत राज विभागाने राबविलेल्या उपक्रमास वारकरी यांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे संकल्पनेतील जर्मन हॅंगर मंडपात हदीरो भाविकांची विश्रांती साठी रिघ लागली आहे.

पालखी मार्गाच्या कडेला मुळेल त्या झाडाखाली दुपार ची व रात्रीची विश्रांती घेणारे भाविकांना मुख्यमंत्री वारकरी सुविधा कक्ष आधार बनला आहे.

जिल्हा परिषदेचे सिईओ कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शना खाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी विशेष लक्ष घालून ही उपक्रम तडीस नेला आहे.



ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे प्रथम प्राधान्य असलेल्या या निवारा केंद्रात सात लाखा पेक्षा अधिक भाविक विश्रांतीला आहेत. धर्मपुरी कारूडे पासून ते वाखरी पर्संत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर १ लाख स्केअर फुटातसह जर्मन हॅंगर मंडप उभारण्यात आले आहेत. याला मुख्यमंत्री सहाय्यता निवारा कक्ष असे नाव दिले आहे. मंडपाचे समोर भव्य स्वागत कमानी आहेत. आत हिरवा मॅट टाकणेत आला आहे. हिरकणी कक्ष, मोबाईल चार्जीग सुविधा, चरण सेवा ( फुट मसाजर ) वैद्यकीय कक्ष, बाजूसा शौचालयाचू व स्नान गृहाची सुविधा स्वतंत्र करणेत आली आहे. आज मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी बोरगाव येथे पाहणी केली.

तसेच ग्रामविकास मंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी महादेव घुले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी वाखरी येथील निवारा केंद्राची पाहणी केली.

जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत 11 जलावरोधक मंडप व 55 जर्मन हॅंगर मंडप उभारणी चे काम करणेत आले आहे.

### ग्रामविकास विभागाच्या उपक्रमास वारकरी यांचा उदंड प्रतिसाद

पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे संकल्पनेतील या उपक्रमास वारकरी यांचा उंदड प्रतिसाद आहे. पालखी सोहळा आलेनंतर लोक जागा घरून विश्रांती साठी बसतात. बाजूस मोबाईल चार्जिग ची सुविधा करणेत आली आहे. टॅंकर ने पिण्याचे शुध्द पाण्याची सोय करणेत आलेली आहे.या मंडपात सात लाखापेक्षा अधिक भाविकांना मुख्यमंत्री सहाय्यता निवारा कक्षाचा आधार मिळाला आहे. सुरक्षित ठिकाणामुळे महिलांची पालखी सोहळ्यातील संख्या वाढत आहे.

### मोबाईल चार्जिग व एलईडी सुविधा

एकाच वेळी 200 मोबाईल चार्जिग करण्याची सुविधा या ठिकाणी मुख्यमंत्री सहायता निवारी कक्षात करण्यात आलेली आहे. या ठिकाणी एलईडी स्क्रीन लावण्यात आलेला असून वेगवेगळी भक्ती गीते व स्वच्छतेविषयी तसेच भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांविषयी माहिती देण्यात येत आहे. यामध्ये थेट विठ्ठल दर्शन ची लिंक देखील उपलब्ध करून देण्यात आलेली आहे यामुळे भाविकांना एकाच छताखाली सर्व सुविधा उपलब्ध झाल्याने वारकरी आनंदित आहेत.







## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून आषाढी वारीसाठी प्रशासनाने केलेल्या सुविधांची पाहणी

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारी 2025 च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने पंढरपूर शहर, मंदिर परिसर, दर्शन रांग (पत्रा शेड), भक्ती सागर(65 एकर) या ठिकाणी वारकरी, भावीकांसाठी प्रशासनाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची पाहणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. व या कालावधीत सर्व पालखी सोहळ्या समवेत येणारे वारकरी, भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याबाबत केलेल्या नियोजनाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, मंदिर समितीचे कार्य अधिकारी राजेंद्र शेळके, प्रांताधिकारी सचिन



इथापे, मुख्याधिकारी महेश रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भक्ती सागर (65 एकर) येथे प्रशासनाने वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांची पाहणी करण्यासाठी बुलेट वरून आले. येथील आपत्कालीन दक्षता व प्रतिसाद केंद्राला भेट देऊन तेथे आयसीयू मध्ये असलेल्या रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच आरोग्य सेवा व्यवस्थित मिळत आहे का याचीही त्यांनी खात्री केली. पोलीस विभागाने वारी कालावधीत ड्रोनद्वारे गर्दी व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नव्याने खरेदी केलेल्या ड्रोनची पाहणी करून उद्घाटनही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. तसेच या ठिकाणी भाविकांसाठी उपलब्ध केलेली शौचालये, हिरकणी कक्ष, पाणीपुरवठा व्यवस्थाची ही पाहणी त्यांनी केली.

त्यानंतर वाळवंटात प्रशासनाने उपलब्ध केलेल्या सुविधांची पाहणी केली व उजनी धरणातून भीमा नदी पात्रात येणारा पाण्याचा प्रवाह नियंत्रित ठेवून वाळवंट वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध राहील, याबाबत नियोजन करण्याचे त्यांनी सुचित केले. तसेच नदीपात्रात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडणार नाही या अनुषंगाने काळजी घेण्याबाबत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी निर्देशित केले. **(पान 2 वर..)**

## संपादकीय

# अर्थसंकल्पाला पुरवणी मागण्यांचे ठिगळे

राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प कार्यान्वित होऊन तीन महिने पूर्ण होईपर्यंतच त्याला पुरवणी मागण्यांची ठिगळे जोडण्यास सुरुवात झाली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारने तब्बल ५७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. अर्थतज्ज्ञ आणि विरोधक टीका करीत असले, तरी महायुती सरकारकडे असलेल्या भक्कम बहुमतामुळे या मागण्या मंजूर होतील; पण दिवसेंदिवस वाढत्या पुरवणी मागण्यांमुळे ह्यनियोजनह्न नामक संकल्पनेलाच धक्के बसत आहेत आणि अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी कागदावरच राहू लागल्या आहेत. अनिवार्य बाबींसाठी किंवा आपत्कालीन परिस्थितीत पुरवणी मागण्या मांडण्यास हरकत असण्याचे कारण नाही. मात्र, त्याचा आता पायंडाच पडू लागला आहे. यंदाच्या पुरवणी मागण्यांमधील मोठा हिस्सा हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून सादर झाल्याचे ढळढळीत दिसते आहे. ही राजकीय अपरिहार्यतेपोटी आर्थिक शिस्तीशी केलेली तडजोडच म्हणावी लागेल.

पुरवणी मागण्यांमध्ये १९ हजार कोटी रुपयांच्या अनिवार्य खचार्चा समावेश आहे, तर ३४ हजार कोटी रुपये कार्यक्रमाअंतर्गत आणि तीन हजार कोटी रुपये केंद्र सरकारच्या योजनांमधील हिश्शापोटी आहेत. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांना मुद्रांकशुल्काचा परतावा, मुंबई मेट्रो आणि भुयारी मार्गांच्या प्रकल्पासाठी राज्य सरकारचा हिस्सा, साखर कारखान्यांना फरकापोटी कर्ज, अपूर्ण सिंचन प्रकल्प, जिल्हा मार्ग आणि पूल; तसेच श्रावणबाळ निवृत्तीवेतन आणि संजय गांधी निराधार योजना, एसटी सवलतींच्या खचार्ची प्रतिपूर्ती आणि पायाभूत सुविधा विकास आदी कामांसाठी या मागण्या आल्या आहेत. सरकारचे पैसे कोठे खर्च करावे, याचे प्राधान्यक्रम ठरवण्याचा आणि बदलण्याचाही सरकारला अधिकार आहे; पण प्रश्न असा की, तीन महिन्यांपूर्वी अर्थसंकल्प मांडताना या खचार्चा विचार का झाला नाही? मुद्रांकशुल्काचा परतावा किंवा एसटीच्या सवलतींपोटीची रक्कम या बंधनकारक बाबी अर्थसंकल्प मांडताना विचारात न घेण्यामागील कारणे काय, याचे कोडे उलगडत नाही. नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद आवश्यकच आहे; पण कुंभमेळा हा अचानक येणारा योग नव्हे. त्यामुळे त्याच्याशी संबंधित आवश्यक खचार्चे नियोजन राज्य सरकारच्या संबंधित विभागाने वेळीच केल्याचे दिसत नाही. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अचानक उद्भवणारे खर्च किंवा आपत्कालीन परिस्थितीत निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुरवणी मागण्यांची संकल्पना पुढे आली. मात्र त्यांचा अतिरेक होऊ लागल्याने मूळ अर्थसंकल्प दिवसेंदिवस अर्थहीन ठरू लागेल काय, अशी भीती वाटू लागली आहे. गेल्या काही काळात सर्वच विभागांना ही लागण होऊ लागली आहे. २०२१-२२च्या चार लाख ९४ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पानंतर एक लाख १७ हजार कोटी रुपयांच्या; तर २३-२४ मध्ये साडेपाच लाख कोटींच्या अर्थसंकल्पात ७६ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आल्या. गेल्या वर्षी तर सहा लाख १२ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पात पावसाळी, हिवाळी आणि पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात, अशा तीन वेळा मिळून एक लाख ३७ हजार कोटी रुपयांच्या, म्हणजे अर्थसंकल्पाच्या २३ टक्के रकमेच्या पुरवणी मागण्यांचा विक्रम झाला. यापैकी पूरस्थिती किंवा आपत्कालीन स्थिती निवारणाचे खर्च समजण्याजोगे आहेत; पण अन्य पायाभूत प्रकल्प किंवा थेट मदतीच्या योजनांचे अर्थसंकल्पाला अस्तर लावण्याची वेळ का यावी?

देशात आर्थिकदृष्ट्या आघाडीवरील राज्य, असा लौकिक असणाऱ्या महाराष्ट्राला आर्थिक शिस्तीचीही मोठी परंपरा आहे. सोळाव्या वित्त आयोगानेही महाराष्ट्राच्या आर्थिक शिस्तीचे कौतुक केले होते; ते शब्द विरेपर्यंतच या प्रतिमेला तडा जाऊ लागला आहे. अर्थसंकल्प सादर करताना खर्चाचा नेमका अंदाज न येणे, अर्थात नियोजनातील त्रुटी आणि खर्चावरील नियंत्रण सुटणे, हे पुरवणी मागण्या वाढण्याचे अर्थ आहेत. पैशांचे सोंग आणता येत नाही, या उक्तीनुसार या रकमांसाठी एक तर अन्य योजनांच्या तरतुदींना कात्री लावणे किंवा तुटीचा डोंगर वाढवणे, एवढेच उपाय राज्य सरकारपुढे आहेत. आधीच महसुली तूट ४५ हजार कोटी रुपयांवर असून, त्यात या ५७ हजार कोटी रुपयांची भर पडून तूट एक लाख कोटी रुपयांवर जाणे, हे आर्थिक बेशिस्तीचे लक्षण आहे. कडक शिस्तीचे म्हणून ओळखले जाणारे अर्थमंत्री अजित पवार आणि अर्थखात्याचा अनुभव असणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची वेळीच दखल घ्यायला हवी. अन्यथा, साऱ्या राज्याचे लक्ष लागणारा अर्थसंकल्प हा निव्वळ कागदोपत्री उपचार बनून राहील आणि अर्थसंकल्पाच्या अंगापेक्षा या पुरवणी मागण्यांचा वाढता बोंगाच जड होऊन जाईल.

## ४ जुलै | स्वामी विवेकानंद पुण्यतिथी

# स्वामी विवेकानंद जगाच्या पाठीवरील तेजस्वी युगपुरुष



स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण,धम्मपद,तनाख, गुरू ग्रंथ साहिब, दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा अवगत केलेल्या होत्या.म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धमार्चा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते. याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कायार्ला एक नवीन वळण आले.वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला.देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दुःखावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.११ सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले.तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला. त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात "बंधु व भगिनी"असे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय! आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले.त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धमार्चे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी. मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वतःची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते. १८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला. अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले.असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे.परंतु अचानक ४ जुलै १९०२ ला ३९ व्या वर्षी स्वामींची प्राणज्योत मालवली व भारतासह जगातील अनेक राष्ट्रांना धक्का बसला.कारण स्वामी अल्प वयात आपल्याला सोडून गेले आणि ज्ञानाची तेजस्वी जोत मावळली.अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे आज सर्वांनाच वाटते.त्यामुळे आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या ह्रदयात घर करून आहे.मी संपूर्ण भारतवासीयांना विनंती करतो की स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे. आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल. जोपर्यंत सुर्य,चंद्र,तारे,आकाश-पाताळ,ग्रह-तारे आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच ह्रदयात राहिल.स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त सरकारने, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यायासह संपूर्ण युवावगार्नी आजच्या दिवशी वृक्षलागवड केली पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण मानव जातीला आणि प्राणीमात्रांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे अनेकांचे प्राण आपल्याला वाचविता येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात व जळामुळात आपल्याला स्वामींचे दर्शन अवश्य होईल.स्वामीच्या पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

## प्रबोधन

# भाविकांनो झटा । देशासाठी देशासाठी

महात्मा गांधीजी एकदा म्हणाले, 'ईश्वर काव्यामध्येही नाही आणि काशीतही नाही.' त्यांच्या मते, भारतातील प्रत्येक घर ईश्वराच्या निवासस्थानाइतकं पवित्र आहे. महात्मा फुले सत्यशोधक होते, तर महात्मा गांधीजी सत्योपासक, सत्यपूजक होते. महात्मा फुले यांनी हिंदूंचे तेहत्तीस कोटी देव नाकारून ज्याला तत्त्वज्ञानाच्या भाषेत एकेश्वरवाद असं म्हणतात, तो स्वीकारून निर्मिक हा शब्द रूढ केला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात स्थापन झालेले आर्य समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज यांचा पुष्कळसा प्रभाव जनमानसावर झाल्यामुळेच स्वामी दयानंद सरस्वतींपासून प्रार्थना समाजापर्यंत सर्व समाजसुधारक-संप्रदायांनी रूढ ईश्वर कल्पना नाकारून तिला अधिक वास्तव रूप दिलं.

शिक्षण प्रसाराने बदलणाऱ्या काळानुसार, ईश्वर कल्पनेत विलक्षण बदल होत गेले. मदर तेरेसा म्हणतात, दरिद्री नारायणाची सेवा हीच खरी प्रभूची सेवा होय. आणि त्यांनी अनाथ, अपंग, अशक्त, निराधार, रोगी, गरीब अशा माणसांच्या सेवेतच आपलं आयुष्य खर्च केलं. आध्यात्मिक चमत्कार ज्यांनी केले, त्यांना संत (Saint) अशी पदवी ख्रिश्चन समाज देतो. मदर तेरेसा यांनी हयातीत कोणताही चमत्कार केला नसतानाही त्यांना मरणोत्तर चमत्काराने संत ही पदवी दिली गेली. अशा विसंगतीतही ख्रिश्चन धर्मगुरू पोप म्हणतात, 'प्रामाणिक माणूस हा ईश्वराची सर्वोत्तम कृती आहे.' हा प्रामाणिक माणूस सज्जन, सद्गुणी, परोपकारी, नीतिमान असेल, म्हणजेच तो भक्त नसला तरीही चालेल. संत तुकाराम महाराजही साडेतीनशे वर्षांपूर्वी सज्जन व्यक्तीलाच पूजनीय, वंदनीय म्हणाले आहेत. ते म्हणतात, करिता देवतार्चन, घरी आले संतजन। देव सारावे परते, संत पुजावे आरते॥ अर्थात, ईश्वरपूजा करताना जर घरी सज्जन माणूस आला, तर आपण देव बाजूला सारावेत आणि सज्जन माणसाचा स्वागतसोहळा, आदरसत्कार मनःपूर्वक करावा. ईश्वरपूजन हे त्यांच्या दृष्टीने दुय्यम दर्जाचे आहे, समाजात वावरणारे सज्जन लोक हेच महत्त्वाचे. वरील विचारात जे पुरोगामित्व लपलेलं आहे, ते अद्यापि दुर्लक्षितच आहे म्हणूनच लोक तीर्थक्षेत्रं, दिंड्या-वाऱ्या यांचे खटाटोप करून त्रस्त होतात.

वास्तविक प्राचीन काळी आस्तिक शिरोमणी चावार्कांच्या निरीश्वरवादी तत्त्वज्ञानाच्या उद्गम आणि विकासानंतर ईश्वरीयशास्त्र किंवा ईश्वरवादामध्ये बरीच सुधारणा होत राहिली, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. दगडाची पूजा करणाऱ्या ईश्वरवाद्यांना बुद्धिप्रामाण्यवादी संत कबीरदासांनी चांगलंच सुनावलंय. ते म्हणाले, पाहत पूजै हरि मिले, तो मैं पुंजू पहाड। ताते तो चक्की भली, पीस खाय संसार ॥ यातून त्यांनी दगडपूजेसह देवही नाकारत असल्याचं ठामपणे सांगितलंय. भक्तांना त्यांनी वेड्यात काढलंय. भक्त दगडाचा लहान देव पूजत असतील, तर कबीर डोंगराचीच पूजा करायला सिद्ध झाले आणि दगडाच्या मूर्तीपेक्षा धान्याचं पीठ करणारं जातं चांगलं, कारण ते जगाला भाकरी देतं, असा उपहासही त्यांनी उघडपणे, निर्भयपणे केलाय. चार्वाकानंतर गौतम बुद्धांनी देवही नाकारला आणि ईश्वरवादी, सनातन हिंदूधर्मही नाकारला.

ईश्वर आहे की नाही या चचेर्ला अंत नाही. कारण ईश्वरवादी लोक कमालीचे हट्टी असतात, हे त्यांना माहीत होतं. म्हणून त्यांनी ही चर्चा बंद करताना, ईश्वराविषयी प्रश्न करणाराही चूक करतो आणि उत्तर देणाराही चूक करतो, असं म्हटलंय. बुद्धांच्या ह्या विचाराने प्रभावित झालेले निरीश्वरवादी आणि प्रखर बुद्धिप्रामाण्यवादी, प्रबोधनकार ठाकरे म्हणतात, 'बौद्धधर्म भारतातून परांगदा होईपर्यंत भारतीय इतिहासात देवळांनी कोठेच काही सुगावा लागत नाही.' म्हणजे आज भारतात जी तिरुपती, द्वारका, काशी, सोमनाथ, पुरी, अयोध्या, कोल्हापूर आणि पंढरपूरचे विठ्ठल मंदिरादि देवळं झालीत, ती अलीकडची आहेत. कानडा विठ्ठल तर यादव काळात प्रस्थापित झाला. त्यापूर्वी वारी, दिंडी, पालख्या यांपैकी काहीही नव्हतं. पण प्रबोधनकार म्हणतात, 'मनुस्मृती, पुराणं आणि देवळं या तीनच गोष्टींवर आज प्रत्येक भट जगत असतो.' ब्राह्मणेतर भाविकांनी ही बाब गंभीरपणे लक्षात घेऊन देव आणि देवळांना धंद्याला लावणाऱ्याला दलालांच्या जाळ्यात किती गुंतायचं, याचं भान राखलं पाहिजे. देव-दानवा नरे निर्मिले ही कविता शंभर वर्षांपूर्वी देवाच्या काल्पनिक सत्याचा चक्काचूर करण्यासाठी केशवसुतांनी लिहिली. आज जे तीर्थयात्रा, वाऱ्या, दिंड्या, पालख्या वाहणारे भक्त आहेत. त्यांनी शालेय जीवनात ती कविता वाचलेली आहे. तरीही त्यांनी त्यापासून काही बोध न घेता पंढरपूर तीर्थस्थानांसारखी गावं ठराविक दिवशी गर्दी करून प्रदूषित करावी, आपापल्या गावी विठ्ठल मंदिरं असूनही अनेक दिवस वारीची पायपीट करण्यात खर्च करून देशाचे अनेक तास वाया घालवावेत, हे किती शहाणपणाचं आहे? पाऊले चालती पंढरीची वाट। सुखी संसाराची तोडूनिया गाठ। हे गाणं कृतीत आणणाऱ्यांनी आपण काय करतो, त्याचा जरा विचार करावा. कारण-

अध्यात्माची दोरी । चिवट असते
तोडिता न तुटते। ध्यानी घ्या ना ॥ १
दोरी ही भक्तीची । नाश वेळ-शक्तीचा
घात कुटुंबाचा । राष्ट्रासह ॥ २
नको दिंडी-वारी। देवधर्म नको
उपवास नको । जीवा जाच ॥ ३
भाविकांनो झटा। देशासाठी
लोकसेवेसाठी । कष्ट करा ॥४
आषाढी, कार्तिकी । चैत्री आणि माघी
धूळधाणी अवघी । आयुष्याची ॥५
अडाण्याला ज्ञान। भुकलेल्या घास
देण्यासाठी आस । बाळगावी ॥६
रंजले-गांजले । ठेवोनिया दूरी
काय देवाद्वारी । साध्य केले ?`७
वारीची वहिवाट । पुरे झाली आता
साधा लोकहिता। बावळ्यांनो ॥८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या काटेकोर नियोजनामुळे भीमा नदीत येणारा विसर्ग बंद

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणातून भीमा नदी पात्रात सोडण्यात येणारा विसर्ग शून्य करण्यात यावा आशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंता व अधिक्षक अभियंता यांना दिल्या होत्या. त्यानुसार जलसंपदा विभागाने तात्काळ कार्यवाही करून उजनी धरणातून भीमा नदी पात्रात येणारा विसर्ग शून्य केला आहे. मागील पंधरा दिवसापासून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पंढरपूर येथे भीमा नदी पात्रातील विसर्ग स्थिर करून वाळवंट रिकामे व्हावे यासाठी प्रयत्नशील होते, त्यांनी केलेल्या सक्षम व काटेकोर नियोजनामुळेच हे शक्य झालं.

उजनी धरणातून भीमा नदी पात्रात येणारा विसर्ग शून्य झाल्याने आज रात्री एक ते दोन च्या दरम्यान चंद्रभागा नदीपात्राची पाणी पातळी योग्य प्रमाणात राहणार आहे. चंद्रभागा नदीपात्राची पाणी पातळी कमी झाल्याबरोबर वाळवंट रिकामे होईल. त्यानंतर दिनांक 4 जुलै रोजी पहाटे पाच ते सहाच्या दरम्यान पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम राबवून वाळवंट स्वच्छ करण्यात येणार आहे. आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना रिकामे व स्वच्छ वाळवंट उपलब्ध होणार आहे. जेणेकरून भाविकांना वारकऱ्यांना आषाढी एकादशी निमित्त वाळवंटात त्यांचे नियमित कार्यक्रम करणे शक्य होणार आहे.

सध्या पुणे जिल्ह्यात सतत पाऊस पडत असल्याने नदी पात्रात आज सकाळी सात हजार पाचशे इतका विसर्ग सोडण्यात आला आहे तो विसर्ग चंद्रभागा नदी पात्रात पाच जुलै रोजी पहाटे पाच वाजता पोहोचणार आहे. उजनीचा विसर्ग पूर्णपणे बंद असल्याने चंद्रभागा पात्रातून 7200 इतकाच प्रवाह राहील. त्यामुळे वारकरी, भाविकांना रिकामे व स्वच्छ वाळवंट वापरण्यास उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वारकरी व भावीक वाळवंटाचा वापर करू शकतात. त्यामुळे पंढरपूर शहरात इतर ठिकाणी भाविक, वारकऱ्यांचा अधिकचा ताण व गर्दी राहणार नाही. पाण्याचा प्रवाह पातळी कमी असल्याने पुंडलिक मंदिर पाण्याखाली जाणार नाही. व वारकरी, भाविकांना चंद्रभागा नदीपात्रात होडीतून जल प्रवास सेवाही उपलब्ध होऊ शकणार आहे.

दिनांक 3 जुलै रोजी रात्री एक पासून ते पाच जुलै 2025 च्या पहाटे पाच पर्यंत भीमा नदी पात्रात येणारा विसर्ग हा 5 हजार क्युसेक असेल तर 5 जुलै च्या पहाटे सहा वाजल्यापासून पूर्ण यात्रा कालावधीत भीमा नदी पात्रात 7 हजार 200 क्युसेक पाण्याचा प्रवाह राहील. त्यामुळे संपूर्ण यात्रा कालावधीत दगडी फुल व पुंडलिक मंदिर तसेच वाळवंट रिकामे होणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मागील पंधरा दिवसापासून उजनी धरणातील पाण्याविषयी केलेल्या काटेकोर नियोजनामुळे उजनी धरणात ही बफर स्टॉक निर्माण झालेला आहे. तसेच भीमा नदी पात्रातील पाण्याचा विसर्ग कमी करणे शक्य झालेले आहे.

# नेताजी प्रशालेत पालक-शिक्षक सभा उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत पालक-शिक्षक सभा २२९ पालकांच्या उपस्थितीत पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार होते. व्यासपीठावर शाळेचे पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, पालक शिक्षक संघाचे सदस्य सिद्धाराम खानापूरे, काशिनाथ माळगोंडे, विठ्ठल कुंभार, राजेंद्र मुलगे, जयश्री बिराजदार आदी उपस्थित होते.



प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पालक शिक्षक संघटनेचे सचिव गणपती पाटील यांनी केले.यावेळी पालक शिक्षक संघाचे नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.मुख्याध्यापक रविशंकर कुंभार (पदसिद्ध अध्यक्ष), राजशेखर घंटे(उपाध्यक्ष), गणपती पाटील (सचिव),वैशाली अभंगे ( सहसचिव) आदीसह वीस तुकड्यांचे पालक व वर्गशिक्षकांची पालक शिक्षक संघाच्या कार्यकारिणी म्हणून यांची निवड करण्यात आली.यासभेत शाळेतील स्वच्छता, मध्यान्ह भोजनाची गुणवत्ता, विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष, त्रैमासिक पालक सभा, करिअर मार्गदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान प्रकल्प,डिजिटल शिक्षण, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

ज्येष्ठ शिक्षक काशिनाथ माळगोंडे यांनी शालेय शिस्तीचे महत्त्व विषद केले तर राजेंद्र मुलगे यांनी शालेय व बाह्य परीक्षासंबधी माहिती सांगितली.पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांनी प्रशासकीय कामकाजात विद्यार्थ्यांचे लागणारे आवश्यक कागदपत्रांची माहिती देऊन शाळेतील परीक्षा,सहल, सांस्कृतिक, स्वच्छता आदी समित्यांची कार्य व जबाबदाऱ्या याविषयीही माहिती सांगितली. मुख्याध्यापक रविशंकर कुंभार म्हणाले, विद्यार्थ्यांचे शालेय शिस्त, संस्कार, शैक्षणिक गुणवत्ता यासह स्काऊट-गाईड उपक्रम, गणवेश, वाचन-लेखन व वक्तृत्व कौशल्य वाढवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांसाठी शासनाच्यावतीने येणाऱ्या सर्व योजना शाळेत राबविण्यात येतात. सर्व पालकांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

सभेत पालकांनी विचारलेल्या सर्व शंकांचे निरसन करण्यात आले.पालक शाळेच्या उपक्रमांविषयी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले तर शिवकुमार शिरूर यांनी आभार मानले.

पान १ वरून

# 'राम कृष्ण हरी आपली...

जिल्हाध्यक्षाची घोषणा करण्यात आली. त्याचबरोबर दुसऱ्या दिवशी त्यांना राज्य कार्यकारिणीवर उपाध्यक्षपद देऊन मनधरणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नवीन जिल्हाध्यक्ष करताना त्यांचा सल्ला घेण्याची तसदीही पक्षश्रेष्ठींनी दाखवली नसल्यामुळे साठे हे संतप्त झाले व त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला .अखेर पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी साठे यांना भेटीला बोलवत त्यांची समजूत काढली.जिल्ह्याचे विभाजन करत दोन जिल्हाध्यक्ष सोलापूर व पंढरपूर विभागासाठी जाहीर करत साठे यांना सोलापूर विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी कायम ठेवले.जिल्ह्यातील महत्वाचे निर्णय स्वतः घेणार असल्याचेही पवार यांनी सांगीतले.त्यामुळे बळीराम साठे यांची नाराजी दूर करत मोहिते पाटील व साठे गटात राजकीय सत्तासमतोल साधला.

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून...

तसेच पत्राशेड येथे असलेल्या दर्शन रांगेची पाहणी ही त्यांनी केली. तसेच दर्शन रांगेतील भाविकांशी संवाद साधून दर्शन रांगेत उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा विषयी माहिती, त्यांनी घेतली.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आषाढी वारी 2025 मध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालखी मार्ग, पंढरपूर शहर, भक्ती सागर, पत्रा शेड, वाखरी तळ येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची सविस्तर माहिती दिली. तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी संपूर्ण यात्रा कालावधीत पोलीस प्रशासनाच्या वतीने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी केलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

# काव्या देशमुखची सैनिक स्कूलसाठी निवड

**माढा (कटूसत्य वृत्त):-** काव्या निलेश देशमुख हिची सैनिक स्कूल प्रवेशाच्या पहिल्या फेरीत उत्तर प्रदेशच्या शासकीय सैनिक स्कूल, मैनपुरी येथे निवड झाली आहे. सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत तिने ३०० पैकी २७२ गुण मिळवून हे यश संपादन केले. पहिल्या प्रवेश फेरीत शासकीय सैनिक स्कूल मध्ये निवड झालेली काव्या निलेश देशमुख ही माढा तालुक्यातील एकमेव विद्यार्थी आहे.ती कुडूर्वाडीतील आदर्श पब्लिक स्कुलची विद्याथीर्नी आहे. तिची यावर्षी नवोदय विद्यालय, पोखरापुर साठी निवड झाली होती. तसेच तिला स्कॉलरशिप परीक्षेत 298 पैकी 286 गुण मिळाले आहेत.



तिला तानाजी खरात, समाधान व्यवहारे, स्वाती खटके, आई सोनाली परबत-देशमुख, वडील मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल आमदार अभिजित पाटील, गटविकास अधिकारी महेश सुळे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, माजी विस्तार अधिकारी शोभा हंडे, केंद्रप्रमुख संजीवनी पौळ-उबाळे, आदर्श पब्लिक स्कुलचे संस्थापक-अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पुजा सुरवसे, युवक नेते रावसाहेब देशमुख, उद्योजक सुरज देशमुख,उद्योजक गोरख खटके-पाटील, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, प्रदेश संघटक दिनेश जगदाळे,मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब पाटिल, तांबवे चे सरपंच राजाभाऊ खटके, मेजर अरूण जगताप, रामभाऊ मिटकल, शिवाजीराव गवळी, सचिन महिंगडे, तडवळेचे सरपंच प्रतिनिधी विश्वनाथ परबत, डॉ. संग्राम परबत, डॉ. बालाजी परबत, सरपंच परिषदेचे संस्थापक-अध्यक्ष जयंत पाटील, बाळासाहेब देशमुख यांनी अभिनंदन केले. काव्याने भविष्यात युपीएससी क्रॅक करून आयएएस, आयपीएस अधिकारी होण्याचा मनोदय व्यक्त केला. तिच्या या यशाबद्दल तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## वात्रटिका

### लिंबू मिरची

सत्तेची लालसा लागली की
किती प्रिय असते खुर्ची...
काल तर चक्क गजब झाले
भवनात पोहोचली लिंबू मिरची...
पुरोगामी महाराष्ट्रात
अघोरी प्रकार राजरोस होतो...
विशेष बाब म्हणजे याचा
प्रमुख लोकप्रतिनिधी असतो...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# बबनदादावरील शस्त्रक्रिया यशस्वी होण्यासाठी पांडुरंगाला साकडे घालणार - हभप महंत शास्त्री महाराज

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढेश्वरी अर्बन बँकेचे चेअरमन माजी आमदार बबनदादा शिंदे याचे सामाजिक, धार्मिक,राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी आयुष्यभर गोरगरीब जनता व शेतकऱ्यांच्या हित जोपासले आहे.त्यांनी फार मोठे पुण्यकर्म केले आहे.बबनदादांच्या रूपाने मतदारसंघातील जनतेला देवअवतारी व्यक्तिमत्व लाभले आहे.सध्या त्यांची प्रकृती अस्वस्थ्य आहे त्यामुळे ते अमेरिकेत शस्त्रक्रियेसाठी गेले आहेत.त्यांच्यावरील हृदय शस्त्रक्रिया यशस्वी होऊन ते लवकरात लवकर बरे होऊन पुन्हा समाजसेवेसाठी सक्रीय व्हावेत यासाठी आम्ही आमच्या पायी दिंडीतील सर्व वारकरी पांडुरंगाला साकडे घालणार असल्याचे प्रतिपादन हभप महंत प्रभाकर शास्त्री महाराज यांनी केले आहे.

ते माढा येथे माढेश्वरी अर्बन बँकेच्या वतीने श्री संत ज्ञानराज माऊली यांच्या दिंडीचे स्वागत व पादुकांचे पूजन करताना मंगळवारी 1 जुलै रोजी बोलत होते.

मागील 13 वर्षापासून श्री क्षेत्र पावनधाम आश्रमचे अध्यक्ष हभप महंत प्रभाकर शास्त्री व जालना जिल्ह्यातील डोंगरगाव चे दिंडी चालक हभप उद्धव घनगाव यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम ते श्रीक्षेत्र पंढरपूर या पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले जात आहे.मंगळवारी सायंकाळी 6.30 वाजता पायी दिंडी सोहळा माढा येथे आल्यानंतर माऊलीच्या पादुका व पालखीचे पूजन माढेश्वरी बँकेचे उपाध्यक्ष अशोक लुणावत व त्यांच्या पत्नी बँकेच्या माजी संचालिका मंगल लुणावत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्हा.चेअरमन अशोक लुणावत यांनी सांगितले की ,पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखों भाविक व वारकरी शेंकडों मैल ऊन, वारा, पाऊस, थंडी, चिखल यांची कसलीही तमा न बाळगता पायपीट करून आषाढी एकादशीला जातात तेंव्हा त्यांचे मन प्रसन्न व आत्मा तृप्त होतो.प्रत्येकाने भक्तीमार्गालाच खरी संपत्ती मानली पाहिजे. जीवनाचे अंतिम ध्येय गाठण्यासाठी प्रत्येकाने पांडुरंगाची मनोभावे भक्ती व सेवा केल्यास खरे आत्मिक समाधान लाभते असे त्यांनी सांगितले.

यावेळी हभप उद्धव घनगाव महाराज यांनी सांगितले की, पांडुरंगाच्या दर्शनासाठी जाताना आमचे स्वागत व व्यवस्था अनेक दानशूर व्यक्ती करतात.माढा येथे बँकेचे चेअरमन माजी आमदार बबनराव शिंदे व उपाध्यक्ष अशोक लुणावत हे अत्यंत चांगल्या पद्धतीची व्यवस्था व आदरातिथ्य आणि सन्मान करतात.ही परंपरा अशीच कायमस्वरूपी सुरू रहावो अशी अपेक्षा त्यांनी माजी आमदार बबनदादा शिंदे यांना दीघार्युष्य लाभावे म्हणून ईश्वराकडे साकडे घातले.



यावेळी माढेश्वरी अर्बन बँकेचे चेअरमन माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेचे उपाध्यक्ष अशोक लुणावत यांनी पायी दिंडीतील सर्व वारकरी व भाविक भक्तांसाठी 300 रेनकोटचे वाटप, महाप्रसाद, फराळ, चहा-पाणी व साई पब्लिक स्कूल येथे मुक्कामाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.बँकेच्या वतीने श्री संत ज्ञानराज माऊली पायी दिंडीची व्यवस्था करण्याचे हे सहावे वर्ष आहे. यावेळी हभप उध्दव घनगाव महाराज, माढेश्वरी बँकेच्या संचालिका विपुला लुणावत, मंगल लुणावत, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मुळे, प्राचार्य रवींद्र सुरवसे, नंदकुमार छाजेड, शशिकांत छाजेड, इंजिनिअर अभिजित लुणावत, वसुली अधिकारी राजकुमार भोळे, वरिष्ठ अधिकारी निलेश कुलकर्णी, आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड, सुरज कंचलवार, शिवाजी घाडगे, विक्रम पाटील, विणाकरी नारायण गवारे, चोपदार रणजित शिनगारे, गणेश गवारे, बळीराम गवारे, ओम घनघाव, समाधान भांगे, विजय मुळे, अक्षय कवटे, आदित्य भांगे, अमरदिप मोरे, संदीप गोरे यांच्यासह शेकडों वारकरी व भाविकभक्त उपस्थित होते.

# राज्यात विखुरलेल्या घडशी समाजाला न्याय देण्यासाठी शासनाने बैठक आयोजित करावी- आ. रणजितसिंह मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात बहुतांश सर्वच जिल्ह्यात घडशी समाज विखुरलेला असून या समाजाची राज्यातील लोकसंख्या सुमारे २.५० लाख ते ३ लाख एवढी आहे.या समाजाचा मुख्य व्यवसाय गावातील मंदिरात झाडलोट करून पहाटे मंदिरात सनई,चौघडा,नगारा वाजवणे व देवाचा नैवद्य वाजत गाजत आणणे असा असुन घडशी समाजाला देवाच्या पाऊता जवळ मान आहे. घडशी समाजातील काही लोक संगीत क्षेत्रात कलाकार, गायक, वादक म्हणून ही परिचित असून हा समाज थोड्या थोड्या स्वरूपात राज्यभरात विखुरलेला असल्याने या समाजास आजपर्यंत कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी विधान परिषदेत आवाज उठवत या समाजाला न्याय देण्यासाठीचा विषय विधानमंडळाच्या पटलावर आणला आहे.

मोहिते पाटील यांनी पुढे बोलताना सांगितले की घडशी समाजाला न्याय देण्यासाठी विशेष मागास प्रवर्ग देण्यात यावा, तसेच या समाजाला अल्पसंख्यांक व आर्थिक दुर्बल घटक म्हणून घोषित करण्यात यावे,या समाजातील कलाकारांना आर्थिक सहाय्य मिळावे,राज्यातील प्रमुख मंदिरांमध्ये घडशी समाजातील लोकांची मानधनावर नियुक्ती



करावी,तसेच या समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकाना उद्योग,व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून द्यावे,घडशी समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, तसेच शासन दरबारी किंवा महामंडळावर प्रतिनिधित्व मिळावे अशा विविध मागण्या विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी या समाजाकडून वारंवार शासनदरबारी करण्यात येत आहेत त्याची दखल घेण्यात यावी.

सरकारने घडशी समाज्याच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून शासनदरबारी बैठक आयोजित करावी व या समाजाला न्याय देण्यासंदर्भात निर्णय घेऊन तातडीने अंमलबजावणी करावी अशी विनंती विधान परिषद सभागृहाच्या माध्यमातून केली आहे. त्यामुळे या समाजाला आता शासनदरबारी न्याय मिळण्याच्या अशा निर्माण झाल्या असून घडशी समाजातून आ.मोहिते पाटील यांचेप्रति आभाराची भावना व्यक्त होत आहे.

# मंदिर समितीकडून दर्शन रांगेचे सूक्ष्म नियोजन- राजेंद्र शेळके

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रेचा मुख्य सोहळा दि. 06 जुलै रोजी संपन्न होत आहे. त्यानिमित्ताने श्रींच्या दर्शनरांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. यंदा मंदिर समितीच्या वतीने दर्शनरांगेचे सूक्ष्म नियोजन करून अत्याधुनिक पध्दतीची दर्शनरांग तयार केली असल्याने दर्शनरांगेतील भाविकांचा प्रवास सुखकर होऊन जलद व सुलभ दर्शन होत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.



संपूर्ण दर्शनरांगेत सीसीटीव्ही कॅमेरे, दिशादर्शक व माहितीचे फलक, भक्तीसंगीतासाठी अत्याधुनिक साऊंड सिस्टीम, लाईव्ह दर्शनासाठी एलईडी व्हॅन व एलईडी टिव्ही, हरवले सापडले केंद्र, फॅब्रिकेटड शौचालये व साफसफाईसाठी जेटींग - सक्षण मशिन, उपजिल्हा रूग्णालय व तालुका वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत आयसीयू, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छता व्यवस्थेकामी पुरेसा कर्मचारी, अन्नदानेश्वर महाराज व जळगांव सेवा समिती मार्फत 24 तास अन्नदान, मंदिर समितीमार्फत मिनरल वॉटर, चहा, तांदळाची व शाबुदाणा खिचडी, सार्वजनिक सुचना प्रसारण प्रणाली, विश्रांती कक्ष, बसण्याची सुविधा, आपत्कालिन व्यवस्थेसाठी आपत्कालिन मार्ग, अग्निशमन व्यवस्था, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र, अत्याधुनिक पध्दतीची विद्युत व्यवस्था, फॅन इ कुलर व्यवस्था, मार्गावरील अडथळा दुर करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपाची उड्डाणपुले उभारण्यात आली आहेत.

यंदा कायमस्वरूपी 4 पत्राशेडच्या शेजारी 100 ७ 450 फुटाचे अत्याधुनिक एक सलग तात्पुरते पत्राशेड उभारण्यात आले आहे. त्याची उंची 16 फूट असून, स्ट्रक्चर 33 पिलरचे उभे आहे व त्यावर 60 फूट लांबीची लोखंडी कैची उभी केली आहे. यामध्ये 100७450७16 फुटात एकच शेड तयार झाले असून एकूण पूर्वीचे 8 पत्राशेड कव्हर झाले आहेत. त्याची उंची 16 फुट व सलग शेड असल्याने आतमध्ये हवा खेळती राहत असून, दर्शनरांग देखील जलद व द्रुतगतीने चालत आहे. याशिवाय, सलग शेड असल्याने भाविकांचे पावसापासून संरक्षण होत आहे तसेच आपत्कालिन दृष्टीने शेडच्या मागील व पुढील बाजूस पुरेसा जागा देखील उपलब्ध ठेवण्यात आली आहे. तसेच या भागातील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी अंडरग्राऊंड स्ट्रॉम वॉटर पाईपलाईन केली असल्यामुळे पावसाचे पाणी इतरत्र वाहत नाही. संपूर्ण बॅरीकेटींग व पत्राशेडचे तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.

याशिवाय, 24 तास दर्शनाची वेळ, भाविकांच्या हस्ते होणा-या पुजा बंद ठेवणे, घुसखोरी रोखणे, व्हिआयपी व्यक्तींच्या दर्शनावर निर्बंध, मॅन काऊटींग मशिन, अनुभवी कमांडोज नियुक्ती व इतर अनुषंगीक उपाययोजना करण्यात आल्याने व दर्शनरांगेचे सुक्ष्म नियोजन करून दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालून भाविकांचा दर्शनरांगेतील प्रवास सुखकर होऊन कमीत कमी वेळेत भाविकांना श्रींचे दर्शन घडत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.

# नातेपुते नगरपंचायतीच्या वतीने वारकऱ्यांना क्यू आर स्कॅनिंग कोड द्वारे सुविधा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ३० जून रोजी नातेपुते शहरात मुक्कामी आल्यानंतर नातेपुते नगरपंचायतीच्या वतीने पालखी सोहळ्या बरोबर असणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना अत्यावश्यक सुविधेसाठी क्यू आर स्कॅनिंग कोड द्वारे सुविधा देण्याचा प्रयत्न केला असून अनेक दिंडीतील वारकरी मंडळींनी या क्यू आर स्कॅनिंग कोडचा लाभ घेतल्याचा दिसून आला असल्याची माहिती नातेपुते नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अतुल पाटील यांनी दिली.क्यू आर कोड मुळे वारकऱ्यांना आपत्कालीन मदत केंद्र, महिलांसाठी हिरकणी कक्ष, स्वच्छतागृह, स्नानगृह, चेंजिंग रूम, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर भरण्याची सुविधा थकलेल्या वारकऱ्यांसाठी चरण सेवा या अनेक सुविधेचे वापर करण्यासाठी सहजरित्या याचा वारकऱ्यांना उपयोग झाला. पुढील वर्षी येणाऱ्या पालखी सोहळ्यामध्ये अद्यावत जीपीएस आधारित क्यू आर स्कॅनिंग कोडची सुविधा यशस्वीरित्या देण्याचा प्रयत्न करणार आहोत. पालखी तळावर मुक्कामाच्या ठिकाणी श्री. संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यातील पादुकाचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक त्या ठिकाणी गर्दी करून असतात नगरपंचायतीच्या वतीने महिलांची व पुरुषांची वेगळी दर्शन रांग बनवून सुलभ व जलद दर्शन देण्याची सुविधा त्या ठिकाणी करण्यात आली होती व त्यासाठी महाराष्ट्र कमांडो रेस्क्यू फोर्सचे वीस कमांडो दर्शन रांगेत ठेवण्यात आले होते. पालखी तळ परिसरात विद्युत प्रवाह खंडित होऊ नये यासाठी संपूर्ण इलेक्ट्रिक सिटी जनरेटरवर ऑपरेट करण्यात आली होती. पालखीतळ व परिसर रस्त्यावर कोणतेही दुकाने लावू न दिल्यामुळे दर्शन रांगेला कोणताही अडथळा आला नाही. गर्दीमुळे मोबाईलवर रेंज अभावे संभाषण होत नसल्याकारणाने प्रशासनातील अनेक अधिकाऱ्यांबरोबर वॉकी टॉकी द्वारे संभाषण होत असल्याने तेथील कामे वेळेत मार्गी लागत होती. नगरपंचायतीच्या वतीने पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांबरोबर नातेपुते व नातेपुते परिसरातील भाविक भक्तांना ही विविध सुविधा पुरवण्यात आले असल्याची माहिती नातेपुते नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अतुल पाटील यांनी दिली. नातेपुते नगरपंचायतीच्या वतीने पालखी सोहळा हा आनंदीमय नियोजनबद्ध पार पडला.



# निवृत्तीनाथ महाराज पालखी टेंभूर्णीतून मार्गस्थ

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** त्रिंबकेश्वर जिल्हा नाशिक येथून पंढरीचा पांडुरंग विठ्ठल माऊली चे दर्शन घेण्यासाठी असंख्य भक्तांसह निघालेल्या विश्र्वगुरू संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे बुधवारी सकाळी ९ वा करमाळा तालुक्यातून माढा तालुक्यातील फुटजवळगाव येथे आगमन झाले यावेळी माढ्याचे तहसीलदार संजय भोसले, टेंभुर्णी चे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी स्वागत केले.

विश्र्वगुरू संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी ही मानाच्या पालखीपैकी एक पालखी असून ती नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथून येते या पालखीमध्ये जवळपास १०० दिंड्यासह एकूण ५० ते ६० हजार वारकरी आहेत.या पालखीचे माढा तालुक्यातील आगमन होताच फुटजवळगाव, अकोले खुर्द, टेंभूर्णी, वेणेगाव मधील नागरिकांनी ठिकठिकाणी पुष्पहार अर्पण करून, फटाक्यांची आतिषबाजी करुन विठ्ठलनामाचा जयघोष करीत स्वागत केले.लहान थोर मंडळीनी दर्शन घेतले.बुधवारचा मुक्काम अकोले बुद्रुक या गावात मुक्काम होता यावेळी भजन किर्तनातून समाजप्रबोधन केले.आज गुरुवारी दुपारी पंढरपूर आणि माढा तालुक्याच्या सिमेवर असलेल्या घोटी पाटी (चांभार विहिर) या ठिकाणी सालाबादप्रमाणे गोल रिंगण होणार आहे. या रिंगण सोहळ्याह दरवर्षी हजारो भाविकांची उपस्थिती असते.



बुधवार रोजी निवृत्तीनाथ महारांचे पालखीसह पहाटेपासून शेकडो दिंड्या टेंभूर्णी शहरातून पंढरपूर च्या दिशेने जात होत्या यामुळे टेंभुर्णी शहरात पुढील पाच तारखेपर्यंत वारक-यांची मांदियाळी असते.

या वारकऱ्यांची टेंभुर्णी कर घरोघरी मनोभावे सेवा करून भोजन निवासाची व्यवस्था केली जाते. ाामुळे आठवडाभर शहरात विठ्ठलाचा जागर केला जातो. भक्तीमय वातावरणात तल्लीन होते.

# उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन घेतले. आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची दर्शन रांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी असून भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे, त्यांना कोणताही अडथळा येऊ नये यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुखदर्शन घेतले यावेळी त्यांच्या समवेत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनीही श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन घेतले.



यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री श्री शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धनाचे काम सुरू असून, झालेल्या कामांची पाहणी केली तसेच मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंदिर जतन व संवर्धन कामाबाबतची माहिती यावेळी दिली.

तसेच यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचा सत्कारही मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केला. यावेळी आमदार समाधान आवताडे, राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री उपस्थित होते

### चौफाळा ते मंदिर उपमुख्यमंत्री गेले चालत

चौफळा ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व मंदिर परिसर वाहन प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या अनुषंगाने मंत्री महोदय तसेच राज शिष्टाचार नुसार अति महत्त्वाच्या व्यक्तींसाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मंदिर समिती मार्फत वाहनांची उपलब्धता करण्यात आली आहे. परंतु उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंदिर व मंदिर परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणात असणारी गर्दी लक्षात घेता. भाविकांना कोणताही वाहतुकीचा त्रास अथवा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी चौफाळा ते मंदिर पर्यंत दर्शनासाठी चालत गेले.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | ■ | ५ | ६ | | ७ | ■ |
| ८ | | ■ | | ■ | ९ | १० | | | ■ | ११ | १२ |
| १३ | | १४ | ■ | १५ | | | | ■ | १६ | | |
| | ■ | १७ | | | ■ | ■ | ■ | १८ | | | ■ |
| १९ | २० | | ■ | २१ | २२ | २३ | ■ | ■ | २४ | | ■ |
| २५ | | ■ | २६ | | | | ■ | २७ | | ■ | २८ |
| ■ | २९ | ३० | | ■ | ■ | ३१ | ३२ | | | ■ | |
| ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | ३५ | | ■ | ३६ | |
| ३७ | | | ■ | ■ | | ■ | ३८ | | ■ | ३९ | |
| | ■ | ■ | ४० | ४१ | | ४२ | ■ | ■ | ४३ | | ■ |
| ४४ | ४५ | ■ | ४६ | | ■ | ४७ | ४८ | | | ■ | ४९ |
| ५० | | | | ■ | ■ | ५१ | | ■ | ५२ | | |

**उभे शब्द :** १) दबंग चित्रपटातील एक अभिनेता, सलमानचा भाऊ २) नॅपकिन (मराठीत) ३) तुरूंग (इंग्रजीत) ४) दूध मोजण्याचे प्रमाण ५) अफगाणिस्तानची राजधानी ६) मला ७) रसदार १०) खडबडीत (इंग्रजीत) १२) नशीब (इंग्रजीत) १४) घरातील कपडे व महत्त्वाच्या वस्तू ठेवण्याची मोठी उभी पेटी १५) कापड फाटताना होणारा आवाज १६) भांड्याना कलई करताना वापरतात तो पांढरा खनिज पदार्थ २०) धावपट्टू (इंग्रजीत) २२) ब्रेड (मराठीत) २३) मुलगा (हिंदीत) २६) मेडल (मराठीत) २७) संस्थेचा सदस्य २८) वर्षाच्या सुरूवातीचा महिना ३०) नऊ+आठ ३२) कागदाचा चतुर्थांश भाग, कॉलम ३४) एक अभिनेत्री-*** टंडन ३६) वस्त्र ३७) चौदा दुणे ४०) दृष्टी ४१) अरण्य, एक (इंग्रजीत) ४२) कष्ट करण्याने दमणे ४३) सांडपाणी वाहणारा नाला ४५) पाणी ४८) शाहिराचे वाद्य ४९) निवडणुकीत उमेदवाराला व्होट देणे-**दान

**आडवे शब्द :** १) भारताचे दिवंगत झालेले केंद्रीय अर्थमंत्री ५) कष्ट करणारा श्रमिक ८) श्री लक्ष्मीदेवीचे एक नाव ९) कलिंगडाप्रमाणे एक फळ ११) मनातील खंत १३) लहान मूल १५) बी च्या वरील आवरण, फोलकट १६) स्वर्गच्या विरूध्दार्थी १७) दोन लाकडी वस्तू जोडण्यासाठी त्यामध्ये बसविलेला निमुळता लाकडी तुकडा १८) आईची बहीण १९) मीठाची चव २१) पत्र २४) पाच+दोन २५) ख्रिश्चन धर्मसेविका २६) वाईट अवस्था, दुर्दशा २७) गस उलट लिहा २९) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ३१) कामकाज ३३) नशीब (हिंदीत) ३५) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी प्रसिध्द असलेले पठार ३६) छ. शिवरायांची लढाई पध्दत-गनिमी ** ३७) नऊ दुणे ३८) छंद, आवड ३९) कथेतील पंख असणारी स्त्री ४०) नऊ नाथ देव ४३) किल्ला ४४) वळीव पावसावेळी आकाशात कडाडणारी ४६) लोक ४७) चवीला कडू ५०) कुत्र्याचा जोडीदार ५१) पाण्याचे बाष्परूप ५२) चांदी

## सुडोकु - 292

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | | 5 | | 6 | 8 | |
| | | | 6 | 8 | 7 | | | 5 |
| 8 | | | | 1 | 3 | | 2 | |
| 4 | | | | | 2 | | | |
| | | 2 | | | 8 | 7 | 6 | |
| | 8 | 6 | 4 | | | 1 | | |
| 3 | | 4 | 8 | | | 2 | 5 | |
| 1 | 5 | 8 | | | | 3 | 4 | |
| | 2 | 9 | | | 5 | | 7 | 1 |

